महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतुक अधिसुचना/ ९८१ /२०२३ दि. ०५/१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण शहरात दि. १५/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ या कालावधीत नवरात्रौत्सव व दसरा हे सण किल्ले दुर्गाडी येथे साजरे होणार आहेत. सदर कालावधीत जनसमुदाय रस्त्यावर येवून सण साजरा करीत असतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** १) लाल चौकी ते दुर्गामाता चौक मार्गे भिवंडी कडे जाणाऱ्या जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **लाल चौकी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने लाल चौकी येथून उजवे वळण घेवून आधारवाडी चौक – गांधारी ब्रिज मार्गे पडघा मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) भिवंडी कडून दुर्गामाता चौक मार्गे लाल चौकी कडे जाणाऱ्या जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना **दुर्गाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने दुर्गामाता चौक येथून डावे वळण घेवून वाडेघर चौक – आधारवाडी चौक मार्गे मुरबाड रोड हायवेने अथवा लाल चौकी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) पत्रीपूल कडून गोविंदवाडी बाहयवळण मार्गाने दुर्गाडी चौक कडे तसेच दुर्गाडी चौक कडून गोविंदवाडी मार्गे पत्रीपुलाकडे येणाऱ्या लहान वाहनांना (कार, रिक्षा) सायंकाळी १६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) सदर वाहने जुना आग्रा रोडने पत्रीपूल – वल्लीपीर –गुरूदेव हॉटेल – शिवाजी चौक – सहजानंद चौक – लाल चौकी मार्गे दुर्गाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) दुर्गाडी चौक येथून लाल चौकी – सहजानंद चौक – शिवाजी चौक – गुरूदेव हॉटेल – वल्लीपीर येथून पत्रीपूल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ४) पत्रीपूल कडून गोविंदवाडी बाहयवळण मार्गाने दुर्गाडी चौक कडे तसेच दुर्गाडी चौक कडून गोविंदवाडी मार्गे पत्रीपुलाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या मल्टीएक्सल वाहनांना सायंकाळी १६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) सदर वाहने रात्रौ ०१:०० ते पहाटे ०६:०० वाजेपावेतो गोविंदवाडी बाहयवळण मार्गाने मार्गस्थ होण्यासाठी मुभा देण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना नवरात्रौत्सव व दसरा सणाचे कालावधीत म्हणजेच दि. १५/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ रोजी दरम्यान सायंकाळी १६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

**प्रत** :– सर्व संबंधीत वाहतूकदार संघटना.

CamScanner